




दैनिक

महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे








●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक १६८ ●बुधवार, दि. १७ सप्टेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये



● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955


# बीडकरांची स्वप्नपूर्ती: रेल्वे सेवेला सुरुवात !

**बीड । प्रतिनिधी**

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या निमित्ताने बीड शहरात प्रथमच रेल्वे धावणार आहे. त्यामुळे १७ सप्टेंबर २०२५, हा दिवस बीड जिल्ह्यासाठी ऐतिहासिक ठरणार आहे. चाळीस वर्षांपूर्वी बीडकरांनी पाहिलेलं रेल्वेचं स्वप्न आज प्रत्यक्षात साकारलं जाणार आहे. या रेल्वे मार्गामुळे बीडचा आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकास नव्या उंचीवर पोहोचेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. अहिल्यानगर-बीड-परळी वैजनाथ हा २६१ किलो मीटर लांबीचा रेल्वे मार्ग तयार व्हावा यासाठी बीड वासियांना मोठा व दीर्घकाळ लढा द्यावा लागला. या रेल्वे मार्गाचा स्वप्न तब्बल दोन पिढ्यांनी पाहिलं. अहिल्यानगर बीड परळी हा रेल्वे मार्ग मराठवाड्याच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. या मार्गावर एकूण १९ स्थानके असतील, ज्यामुळे बीड शहर आणि आजूबाजूच्या ग्रामीण भागांचा थेट संपर्क देशाच्या इतर भागांशी होईल. या प्रकल्पासाठी सुमारे ४१०० कोटी रुपये खर्च झाले असून, केंद्र आणि राज्य सरकारच्या संयुक्त भागीदारीतून हे काम पूर्ण झाले आहे. राज्य सरकारने या प्रकल्पासाठी निम्मा निधी पुरवला असून, नुकतेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी १५० कोटी रुपयांचा अतिरिक्त




**● अहिल्यानगर–बीड–परळी वैजनाथ रेल्वेमार्ग म्हणजे बीड, अहिल्यानगर आणि परळी वैजनाथ भागातील शेतकरी, विद्यार्थी, उद्योजक, व्यापारी आणि सामान्य जनतेसाठी विकासाला नवी गती देणारा प्रकल्प आहे. या मार्गामुळे जिल्ह्यातील गुंतवणूक वाढेल, रोजगारनिर्मिती होईल आणि वाहतूक सुलभ होईल. बीड जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी हा प्रकल्प गतीमान करण्याचा माझा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे. बीड जिल्ह्याचा चेहरा बदलणाऱ्या या प्रकल्पामुळे बीडकरांच्या आयुष्यात नवा विकासप्रवास सुरू होईल असा विश्वासही उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला आहे.**


▶▶ उर्वरित पान २ वर

## कपिलधार येथे भुस्खलनाचा धोका, ग्रामस्थांना धोका होणार नाही यासाठी उपाययोजना कराव्यात : आ.संदीप क्षीरसागर

**● जिल्हाधिकाऱ्यांना पत्रकातून केली मागणी**

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील कपिलधार येथे भुस्खलनाचा धोका निर्माण झाला असून ग्रामस्थांच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना करण्याची मागणी आ. संदीप क्षीररसागर यांनी केली आहे. बीड विधानसभा क्षेत्रातील मौजे कपिलधार ग्रामपंचायत पाली अंतर्गत येत आहे. सदरील गाव हे डोंगराच्या कुशीत वसलेले आहे. तसेच त्याच्या बाजूला कपिलधार हे तीर्थक्षेत्र हे ठिकाण आहे. याठिकाणी हजारो भाविक भक्त दर्शनासाठी येत असतात.मात्र या ठिकाणी भुस्खलनाचा धोका निर्माण झाला असून संरक्षण भिंत पूल देखील कोसळली आहे. याबाबतीत आ. संदीप क्षीरसागर यांनी ▶▶ उर्वरित पान २ वर



**● बीड, शिरूर(का),वासनवाडी येथे तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना केल्या**

**वासनवाडी ता.बीड येथील गाव तलाव फुटला असून परिसरातील ग्राम स्थांनी खबरदारी घ्यावी. तसेच बीड व शिरूर (का) तालुक्यातील नदी पात्रावरील रहदारी योग्य असणारा पुल वाहुन गेलेले आहेत. त्या बाबतीत तातडीने उपया योजना बाबत प्रशासनास सूचना केल्या आहेत.**

## लाखो लोकांच्या अब्जावधी रुपयांवर डल्ला मारुन फरार असलेल्या...
## ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या अर्चना कुटे अटक

**बीड । प्रतिनिधी**

लाखो लोकांच्या अब्जावधी रुपयांवर डल्ला मारून गेल्या वर्ष दीड वर्षापासून फरार असलेल्या कुठे ग्रुपच्या प्रमुख आणि ज्ञानराधा मल्टीस्टेट च्या प्रकरणातील आरोपी अर्चना कुटे आणि अन्य एका महिलेस पुणे येथून अटक करण्यात आल्याची माहिती खात्रीलायक सूत्रांनी दिली आहे. ऑक्टोबर २०२३ मध्ये कुटे ग्रुपच्या सर्वच समूहांवर इन्कम टॅक्स विभागाच्या वतीने छापा घालण्यात आला होता मोठ्या प्रमाणात इन्कम टॅक्स चोरी केल्याचे उघडकीस आल्यानंतर कुठे यांची सर्व प्रतिष्ठान सील करण्यात आली होती. द कुटे ग्रुप वर इन्कम टॅक्स विभागाकडून कारवाई झाल्यानंतर त्याचा परिणाम ज्ञानराधा मल्टीस्टेट च्या व्यवहारावर झाला मोठ्या प्रमाणात ज्ञानराधा मध्ये ठेवी ठेवलेल्या ठेवीदारांना पैसे ▶▶ उर्वरित पान २ वर



## बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करण्याची धनंजय मुंडे यांची पालकमंत्री अजित दादा पवार यांच्या कडे पत्राद्वारे मागणी



**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या नुकसानीचा आढावा पालकमंत्री अजित दादा पवार यांच्या उपस्थितीत आज बीड जिल्हाधिकारी कार्यालयात सुरू आसलेल्या आढावा बैठकीत घेण्यात आला. यावेळी परळी मतदासंघासह बीड जिल्ह्यात अतिवृष्टी व पुरामुळे भीषण परिस्थिती निर्माण झाली असून, खरीप पिके हातातून गेली आहेत तसेच जन जीवन विस्कळीत होऊन प्रचंड वाताहत झाली असल्याचे नमूद करत माजी मंत्री, आ. धनंजय मुंडे यांनी संपूर्ण बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ ▶▶ उर्वरित पान २ वर

## रेल्वेसाठी जनतेचा सालगडी म्हणून पाठपुरावा केल्याचा आनंद: खा.सोनवणे

**बारा वर्षात ९९ तर बारा महिन्यात वडवणीपर्यंत रेल्वे मार्गाचे काम केल्याचा खा.सोनवणेंकडून उल्लेख**

**बीड । प्रतिनिधी**

बीडला रेल्वे आलीच पाहिजे', ही घोषणा लहानपणी ऐकली होती. बीड जिल्ह्यातील अनेकांनी रेल्वेसाठी आंदोलने केली, ३०० आंदोलकांवर गुन्हे दाखल झाले. यातील काहींनी जेल भोगले. प्रकल्प मंजुरीनंतर मागील बारा वर्षात केवळ ९९ किलोमिटर रेल्वे मार्ग पुर्ण झाला होता, मात्र आपण खासदार झाल्यानंतर बारा महिन्यात ६७ किलोमिटर मार्गाचे काम पुर्ण करून पुढे ▶▶ उर्वरित पान २ वर



**● ओल्या दुष्काळाची केली मागणी**

**बीड जिल्ह्यात दि. १४-१५ आणि १६ रोजी सलग तीन दिवस अतिवृष्टी झाली आहे. परिणामी, शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून आता सरकारने पंचमाने न करता बसता शेतकऱ्यांना सरसकट मदत करावी. मी अतिवृष्टीग्रस्तांची भेट घेतली असून त्यांचे दुखः पाहवत नाही, असेही खा.सोनवणे म्हणाले.**

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा बीड जिल्हा दौरा

**बीड । प्रतिनिधी**



राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बीड जिल्ह्याच्या दोऱ्यावर येत आहेत, त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे. दिनांक १७ सप्टेंबर, २०२५ रोजी सकाळी ११.४५ वा.हेलिकॉप्टरने , परेड ▶▶ उर्वरित पान २ वर

## गुन्हेगारांचे तुम्ही कर्दनकाळ बना, मी सदैव तुमच्या पाठीशी : पोलीस अधीक्षक नवनीत कावत

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहर पोलिसांनी मागील सात वर्षांपासून फरार असलेल्या बहिणीच्या खुनाच्या आरोपीला पकडण्यात यश मिळवले आहे. विठ्ठल उर्फ सोनू प्रकाश काळवणे राहणार एमआयडीसी, पेठ बीड, बीडआरोपी कोविड काळात जेलच्या बाहेर आला होता आणि तेव्हापासून तो फरार होता. अखेर पोलिसांनी त्याला पकडून जिल्हा कारागृहात दाखल केले. ही खरोखरच कौतुकास्पद कामगिरी आहे. तसेच, सोहेल खान ▶▶ उर्वरित पान २ वर



## 'ई- पीक' पाहणीची मुदत ३० सप्टेंबर पर्यंत वाढवावी

**ही मागणी अजितदादांनी बैठकीतच मान्य केली**

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील आपत्ती व्यवस्थापना त बैठकीमध्ये उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित दादा पवार यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीम ध्ये नुकत्याच झालेल्या पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या पिकांचे पीक पाहणी ची मुदत वीस ▶▶ उर्वरित पान २ वर






## कोणताही भेदभाव न करता नुकसानीचे पंचनामे तातडीने करा: उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार

**पूर परिस्थितीच्या नुकसानीचा घेतला आढावा**





**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात आलेल्या अतिवृष्टीमुळे उदभवलेल्या पूर परिस्थितीने झालेल्या नुकसानीचे कोणताही भेदभाव न करता तातडीने पंचनामे करा, असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांनी दिले. जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांनी १४ व १५ सप्टेंबर रोजी आलेल्या अतिवृष्टीने उदभवलेल्या परिस्थितीमुळे झालेल्या नुकसानीचा आढावा आयोजित बैठकीत घेतला. त्यावेळी ते बोलत होते.

बैठकीला खासदार बजरंग सोनवणे, आमदार सर्वश्री विक्रम काळे, सुरेश धस, प्रकाश सोळंके, धनंजय मुंडे, विजयसिंह पंडित, आमदार श्रीमती नमिता मुंदडा, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत काँवत,अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक, निवासी उपजिल्हाधिकारी शिवशंकर स्वामी आदी प्रामुख्याने उपस्थित होते. श्री. पवार पुढे म्हणाले की, जिल्हा प्रशासनाकडून ▶▶ उर्वरित पान २ वर




# बीडकरांची 40 वर्षांची स्वप्नपूर्ती !
# अहिल्यानगर ते बीड 'रेल्वे'सेवेला सुरुवात




बहुचर्चित, बहुप्रतीक्षित आणि जिल्ह्याच्या विकासात मैलाचा दगड ठरणाऱ्या रेल्वे प्रकल्पातील म हत्त्वाचा टप्पा मराठवाडा मुक्तिसंग्रामदिनी बुधवारी (ता. १७) पूर्ण होत आहे. तब्बल चाळीस वर्षांपासून प्रतीक्षेत असलेल्या बीडकरांना बीड ते अहिल्यानगर असा प्रवास करता येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार हिरवा झेंडा दाखवतील आणि ही रेल्वे सेवा सुरू होईल, बीडकरांचे स्वप्न पूर्णत्वाला जाईल. दरम्यान, परळीकरांच्या स्वप्नपूर्तीसाठी अजून प्रतीक्षा करावी लागेल.

अशी आहेत स्थानके- अहिल्यानगर-परळी रेल्वे प्रकल्पांतर्गत सुरू होणाऱ्या या डेमू रेल्वेला अहिल्यानगर ते बीडदरम्यान १६ स्थानके आहेत. नगरहून सुटलेली गाडी नारायणडोह, लोणी, सोलापूरवाडी, धानोरा, कडा, आष्टी, अमळनेर (भांड्याचे), रायमोह, एगनवाडी, जाटनांदूर, राजुरीमार्गे बीड येथे पोचेल.

असे आहे वेळापत्रक- अहिल्यानगरहून सकाळी ६:५५ ला रेल्वे सुटेल व दुपारी १२:३० ला बीडला पोचेल. परतीच्या प्रवासात बीडहून ती दुपारी एकला सुटेल आणि सायंकाळी साडेसहाला अहिल्यानगरला पोचेल. आठवड्यात सहा दिवस ही गाडी धावणार असून रविवारी विश्रांती असेल.

सध्या डिझेलवर नंतर विजेवर- या रेल्वेसाठी महापारेषणकडून वीज घेतली जाणार आहे. त्यासाठी २३२ केव्हीए क्षमतेच्या दोन उपकेंद्रांची उभारणी अंतिम टप्प्यात आहे. हे काम पूर्ण होईपर्यंत रेल्वे डिझेलवर धावणार असल्याने वेग काहीसा कमी असेल. विद्युतीकरणानंतर हा प्रवास वेगवान होईल.

स्वस्तात प्रवास पण शहरापासून दूर- अहिल्यानगर-बीड हा प्रवास स्वस्तात म्हणजे ४५ रुपयांत होणार आहे. मात्र, रेल्वेस्थानक शहरापासून दूर असल्याने तिथपर्यंत रिक्षाने जाण्यासाठी याहून अधिक पैसे मोजावे लागण्याची शक्यता आहे.

**महत्त्वाचे मुद्दे....**

- २६१ पैकी १६६ किलोमीटर लोहमार्ग पूर्ण
- केंद्र - राज्याचा निम्मा वाटा असलेला प्रकल्प - ३५५ कोटींचा प्रकल्प ४८०० कोटींवर
राज्य सरकारकडून आतापर्यंत २२४१ कोटींचा निधी - अहिल्यानागर-बीडदरम्यान १६ स्थानके
आठवड्यात सहा दिवस धावणार रेल्वे
- ४५ रुपये तिकीट; ५ तास २५ मिनिटांचा वेळ
सध्या डिझेलवर धावणार रेल्वे

प्रकल्पाचा खर्च गगनाला- ४० वर्षांपूर्वी मागणी असलेल्या या लोहमार्गाला १९९५ मध्ये तांत्रिक मान्यता मिळाली. त्यावेळी प्रकल्पाचा खर्च ३५५ कोटी रुपये होता. हा प्रकल्प विविध कारणांमुळे लांबला. सध्या प्रकल्पाचा खर्च तब्बल ४८०० कोटींवर पोचला आहे. या प्रकल्पासाठी राज्य सरकार निम्मा व केंद्र सरकार निम्मा खर्च करत आहे. राज्य सरकारने आतापर्यंत २२४१ कोटी रुपयांचा निधी दिला आहे.

मूळ मार्ग २६१ किलोमीटरचा- अहिल्यानगर-बीड-परळी असा हा २६१ किलोमीटरचा मार्ग आहे. त्यावरील अहिल्यानगर-बीड असा १६६ किलोमीटरचा टप्पा पूर्ण झाला आहे. बीड ते परळी दरम्यानच्या टप्प्याची काही कामे अद्याप अपूर्णच आहेत. त्यामुळे पहिल्या टप्प्यात बीड-अहिल्यानगर अशी रेल्वे सुरू होत आहे. परळीकरांच्या स्वप्नपूर्तीला किती दिवस लागतात, हे आगामी काळात कळेलच.

विलासरावांनी घेतला होता निर्णय- केंद्र सरकारच्या अखत्यारीत रेल्वे प्रकल्पासाठी निम्मा खर्च राज्याने करण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी घेतला. केंद्र व राज्याचा समान खर्च असलेला त्यावेळी हा पहिला प्रकल्प ठरला. या मार्गावरून प्रत्यक्ष रेल्वे धावावी यासाठी अलीकडच्या काळात पालकमंत्री अजित पवार यांनी प्रयत्न केले.

# पालकमंत्री अजित पवार यांच्या नावाने धमकविण्याचा प्रयत्न

## शेख सबिया अंजुम शकील अहेमद, पूजा शशिकांत देशभ्रतार यांनी दिला आत्मदहनाचा इशारा

## वरद ग्रुप, जाधव, कुरळे, दाजी पिंगळे विरोधात जिल्हाधिकाऱ्यांना तक्रार

**बीड । प्रतिनिधी**

शहरापासून जवळ असलेल्य तळेगाव येथील कुळ जमीन तहसीलदार बीड यांच्या न्यायालयात अर्जदार शेख सबिया यांच्या बाजूने निकाल लागला असून, प्रकरण पाठीमागे घेण्यासाठी बीड शहरातील वरद ग्रुप, कल्याण दाजी पिंगळे, भास्कर जाधव, कुरळे, यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे काही नेते संबंधित अर्जदारावर दबाव टाकत आहेत, पालकमंत्री अजित पवार हे बीड जिल्हा दौऱ्यावर येत आहेत त्यांना सांगत जिल्हाधिकारी यांच्याकडून निकाल फिरविण्यात येणार असल्याने तुम्ही पाठीम ागे म्हणत धमकीण्याचा प्रयत्न होत असल्याने आज १७ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यासमोर शेख सबिया अंजुम व पूजा देश भ्रतार त्यांनी आत्मदहन करण्याचा इशारा दिला असून या प्रकरणात काही बरे वाईट झाल्यास वरील मंडळी जबाबदार असल्याचे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,

तहसीलदार बीड यांचे कोर्टात मौजे तळेगाव ता. जि. बीड येथील सर्वे क्र. १९ चे गट, २४, २५, २६, २७, २८,२९, मधील क्षेत्र १९ एकर २२ आर व सर्वे क्र. २० चे गट क्र. १५,१६,१७,१८,१९,२०,२१,२२,२३, मधील क्षेत्र २१ एकर ४ आर जमिनीचे प्रकरण क्र. २०२५/कुळ/कावी-४०१२ (शेख अंजुम वि. भास्कर जाधव व इतर) दाखल केले होते, सदर प्रकरणाचा दि. ०४/०९/२०२५ रोजी निकाल लागला असून सदर वादग्रस्त जमीनी वरील गैरअर्जदार व त्यांनी हस्तांतरित केलेल्या सर्व मिळकती वरील नोंदी कमी करून मूळ मालक गुलाबबी किशन प्रसाद यांचे नावाची नोंद करणे बाबत दि. ०४/०९/२०२५ रोजी आदेश पारित केलेला आहे.

गैरअर्जदार जाधव, कुरुळे, व वरद ग्रुप चे कल्याण (दाजी) पिंगळे व उत्तमराव मिसाळ हे व इतर नेते मंडळी हे सर्व मिळून आम्हाला प्रकरण काढून घेण्या बाबत दबाव टाकून म्हणतात की, आम चे नेते अजित दादा पवार हे दि. १७/०९/२०२५ रोजी बीड येथे येणार आहेत त्यांना सांगून आम्ही जिल्हाधिकारी यांना दबाव टाकून प्रकरणात स्थगिती घेणार आहोत अश्या धमक्या देत आहेत, सदर जमीन ही आमची आजी गुलाबबी किशन प्रसाद यांचे मालकीची ईनामी वर्ग - २ असून गैरअर्जदार यांनी आजपावेतो वर्ग १ म्हणून ७/१२ वर बेकायदेशीर नोंदी घेतलेल्या आहेत, सर्व कागदपत्रा चे अवलोकन होऊन तहसीलदार बीड यांनी न्यायनिर्णय पारित केलेला आहे, वरील लोक हे तुमच्या नावाची धमकी देऊन आमचे वर अत्याचार करत आहेत,

आपणास नम्र विनंती की, आम्हाला न्याय देण्यात यावा, जर आपण आम्हाला न्याय नाही दिल्यास, आम्ही दि. १७/०९/२०२५ रोजी सकाळी ११:०० वा जिल्हाधिकारी कार्यालय समोर आत्मदहन करणार आहोत, होणाऱ्या परिणामास सर्व प्रशासन जबाबदार राहील, शेख सबिया अंजुम शकील अहेमद,पूजा शशिकांत देशभ्रतार. यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

◆ पान १ वरून पुढे...

## बीडकरांची स्वप्नपूर्ती....

निधी मंजूर केला आहे. अहिल्यानगर ते बीडदरम्यान १६ स्थानके आहेत. नगरहून सुटलेली गाडी नारायणडोह, लोणी, सोलापूरवाडी, धानोरा, कडा, आष्टी, अमळनेर (भांड्याचे), रायमोह, एगनवाडी, जाटनांदूर, राजुरीमार्गे बीड येथे पोचेल.अहिल्यानगरहून सकाळी ६:५५ ला रेल्वे सुटेल व दुपारी १२:३० ला बीडला पोचेल. परतीच्या प्रवासात बीडहून ती दुपारी एकला सुटेल आणि सायंकाळी साडेसहाला अहिल्यानगरला पोचेल. आठवड्यात सहा दिवस ही गाडी धावणार असून रविवारी विश्रांती असेल.

## कपिलधार येथे...

वारंवार शासनाकडे पत्र व्यवहार करून उपाययोजना करण्याची मागणी केली होती. १३ सप्टेंबर पासून सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे संरक्षण भिंत देखील कोसळली आहे. तसेच रहदारी साठी योग्य असलेला रस्ता देखील खचत चालला आहे. त्यामुळे जीवित हानी टाळण्यासाठी व कपिलधारवाडी ग्रामस्थांना कोणताही धोका होणार नाही यासाठी सर्वतोपरी तथा उचित कार्यवाही करावी. तसेच पुढील धोका टाळण्यासाठी शासनस्तरावर प्रस्ताव सादर करावे व आजघडीला जी हानी झालेली आहे याबाबतीत दुरुस्ती करण्यासाठी आदेश द्यावेत अशी मागणी आ. संदीप क्षीरसागर यांनी बीडच्या जिल्हाधिकारी यांना दिलेल्या पत्रकातून केली आहे.

## लाखो लोकांच्या...

मिळण्यास अडचणी येऊ लागल्या पेनिक होऊ नका शांततेने घ्या आपल्याला लोन सॅमसंग झाले आहे अशा मोठ्या बाता मारणारे व्हिडिओ कुटे यांच्यावतीने मीडिया मधून प्रसारितही करण्यात आले परंतु ठेवीदारांना छदामही मिळाला नाह. अखेर सुरेश कुटे अर्चना कुटे आशिष पाटोदकर यशवंत कुलकर्णी यांच्यासहित संचालक मंडळ व कर्मचाऱ्यांवर बीड संभाजीनगर जालना लातूर धाराशिव पुणे अशा विविध ठिकाणी गुन्हे दाखल झाले जून २०२४ मध्ये सुरेश कुटे आणि आशिष पाटोदकर यांना पोलिसांनी अटक केली त्यांच्यासोबत सर्व अर्चना कुठे यादीतील एस पी कार्यालयात आल्या होत्या परंतु तत्कालीन एसपी नंदकुमार ठाकूर यांनी कुठे मॅडमला चहा कॉफी करून परत पाठवले. पोलिसांच्या आशीर्वादावर तब्बल वर्षभर पुणे मुंबई महाबळेश्वर अशा ठिकाणी ऐश करत फिरणाऱ्या अर्चना कुटे यांना अखेर पोलिसांनी पुणे शहरातील पाषाण रोड भागातून अटक केली आहे त्यांच्यासोबत आशिष पाटोतकर च्या आईला देखील पोलिसांनी अटक केली आहे.

## बीड जिल्ह्यात...

जाहीर करून त्यातील निकषानुसार जिल्ह्यातील शेतकरी व आपत्ती ग्रस्तांना मदत करण्याची लेखी मागणी केली आहे. याबाबतचे निवेदन आ. धनंजय मुंडे यांनी अजित पवार यांना दिले आहे.

## रेल्वेसाठी जनतेचा...

वडवणीपर्यन्त हायस्पीड ट्रायल रन यशस्वी झाला आहे. या कामासाठी सततचा पाठपुरावा आवश्यक असून मी जनतेचा सालगडी म्हणून हे काम करत आहे. आपल्याला रेल्वेचे श्रेय अजिबात घ्यायचे नसून आज रेल्वे बीडला येत असून जिल्ह्यासाठी हा आनंदाचा क्षण असल्याचा उल्लेख खा.बजरंग सोनवणे यांनी म्हटले.

बीड येथील शासकिय विश्रामगृह येथे पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. यावेळी खा.बरजंग सोनवणे यांच्यासोबत राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, पिंटू ठोंबरे यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना खा.सोनवणे म्हणाले, आजपासून बीडला रेल्वे सुरू होत आहे. बीडला रेल्वे यावी, यासाठी अनेकानी योगदान दिले आहे. रेल्वेसाठी मोठा संघर्ष करावा लागलेला आहे. बीड रेल्वेसाठी लढा देणारे सर्व स्वातंत्र्य सैनिक, रेल्वे कृति समितीमधील सर्व सदस्य यांच्या सततच्या लढ्याला यश आले. मी खासदार झालो त्यावेळी रेल्वे अंमळनेरपर्यंत आलेली होती. खासदार म्हणून शपथ घेतल्यानंतर पहिले प्राधान्य हे रेल्वेला दिले. पहिली बैठकही रेल्वे विभागाची घेतली. प्रकल्पासाठी येत असलेले अडथळे व उपाययोजना बाबत माहिती घेतली. संसदीय पक्षाच्या नेत्या खा.सुप्रिया सुळे यांचे आवश्यक ठिकाणी मार्गदर्शन घेत केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव व रेल्वे बोर्ड अध्यक्ष सतिषकुमार यांच्याकडे सतत पाठपुरावा

◆ पान १ वरून पुढे...

करत रेल्वेबाबतीत येणाऱ्या अडचणी सांगून त्या सोडविण्यासाठी प्रयत्न केले. मुख्यमंत्री फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचेही सहकार्य लाभले. मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक धर्मवीर मीना व त्यांच्या विभागाशी सातत्याने बैठका घेत संपर्क ठेवला. रेल्वेमंत्री, रेल्वे बोर्ड, मध्य रेल्वे मुंबई व आहिल्यानगर कार्यालय येथे वारंवार बैठका घेतल्या. ठेकेदार कोण आहे हे न पाहता काम गतीने होण्याकडे लक्ष दिले, यामुळे रेल्वेकामाला गती आली. अडचणीच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेटी व स्थानिक नागरिकांशी चर्चा करून मार्ग काढला. हे करताना तत्कालीन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ, अविनाश पाठक आणि आता विवेक जॉन्सन तसेच रेल विभागाचे आर. के.यादव, लोळगे व त्यांचा संपूर्ण स्टाफ यांनी चांगले काम केले. रेल्वे मंजूरी मिळाली तेव्हा आपण या प्रक्रियेत नव्हतो, आंदोलनातही नव्हतो, परंतु खासदार म्हणून मला रखडलेल्या कामांचा पाठपुरावा करून त्या काम ांना गती देता आली. याच पाठपुराव्यामुळे बारा महिन्यात वडवणीपर्यन्त काम पुर्ण होऊ शकले. बीड जिल्ह्याला रेल्वेची भेट देणे हे माझ्यासाठी एक शेतक-याचा मुलगा म्हणून केवळ काम नाही, तर आयुष्यभर लक्षात राहणारा आनंदाचा क्षण आहे, असे खा.बजरंग सोनवणे म्हणाले.

### रेल्वेची चुकीच्या पध्तीतीने कामे

आपण खासदार होण्याआधी झालेली रेल्वेची कामे चुकीच्या पध्दतीने झालेली आहेत. अनेक ठिकाणी रेल्वेपुलाखाली पाणी साचते. अनेक ठिकाणी पुलच चुकीचे बांधले. तर हायस्पिड चाचणी होईपर्यत विद्यूतीकरणाच्या कामांकडे दुर्लक्ष करणे, असे प्रकार झालेले आहेत. परंतु माझ्या कार्यकाळात चुकीची कामे होणार नाहीत, यासाठी मी लक्ष ठेवून आहे, असे खा.बजरंग सोनवणे म्हणाले.

### २०२६ मध्ये काम पुर्ण

जिल्ह्यात १० ठिकाणी नवीन रेल्वे ओव्हरब्रिज व अंडरपास लवकरच सुरू करण्यात येतील. बीड शहरातील बार्शी नाका येथे रेल्वे थांब्याचा प्रस्ताव पुढे पाठविला आहे.बीड शहराजवळील ढोले वस्ती येथे अंडरपासचे काम निश्चित करण्यात येईल. रेल्वेमार्गाचे काम गतीने सुरू असून मार्च २०२६ पर्यंत अहिल्यानगर-परळी रेल्वे मार्ग सुरू होईल.

### बीडकरांसाठी रेल्वेचे फायदे

शेतीमाल, भाज्या, फुले, धान्य त्वरित देशभर पोहोचवणे सोपे.
मुंबई-पुणे या मोठ्या बाजारपेठेशी जोडणी.
पर्यटन, तीर्थाटन, व्यापार, व्यवसायासाठी नवे दार उघडले.
बीड-पुणे -मुंबई-नगर या भागात राहणाऱ्या लेकी-बाळींसाठी माहेरी येणे सोपे. मुलांसाठी 'झूक झूक गाडी'ने मामाच्या गावाला जाण्याची नवी सोय.
साठ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर रेल्वे बीडमध्ये पोहोचली.

### खा.सोनवणेंकडून यांचाही उल्लेख

बीड रेल्वेची पहिली मागणी तत्कालीन खासदार गंगाधर आप्पा बुरांडे यांनी केली. स्व.खा. केशरकाकु क्षीरसागर व स्व.गोपीनाथराव मुंडे यांनी लोकसभेत वारंवार आवाज उठवला. रेल्वे कृती समिती, स्वातंत्र्यसैनिक, आणि जनआंदोलन करणारे सर्व मान्यवर आदिंचा संघर्ष यशस्वी झाला. आतापर्यंत ३०० आंदोलनकर्त्यांवर गुन्हे दाखल झाले. सर्वांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे बीडला रेल्वे आली आहे, असा उल्लेख खा.सोनवणे यांनी केला.

## मुख्यमंत्री देवेंद्र...

मैदान हेलिपॅड पोलीस मुख्यालय, बीड येथे आगमन, ११.५०. वा. म ाटारीने बीड अभियानाचा मा. पंतप्रधान यांच्या हस्ते ऑनलाईन शुभारंभ. ०१.०० वाजता अमळनेर ते बीड नवीन रेल्वे मार्गाचे उद्धघाटन आणि बीड ते अहिल्यानगर रेल्वेस हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ करतील. ०२.०५ वाजता मोटारीने पोलीस परेड मैदान, पोलीस मुख्यालय बीडकडे प्रयाण. ०२.२० हेलीकॉप्टरने छत्रपती संभाजीनगर विमानतळाकडे प्रयाण करतील.

## गुन्हेगारांचे तुम्ही...

नावाचा गुंड बशीर गंज भागात सामान्य नागरिकांना त्रास देत होता. या गुंडाला एक वर्षासाठी स्थानबद्ध करण्यात आले असून त्यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. या दोन्ही यशस्वी कारवायांबद्दल बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कावत यांनी मासिक गुन्हे आढावा

◆ पान १ वरून पुढे...

बैठकीत बीड शहर पोलिस पथकाला प्रशस्तीपत्र देऊन शाबासकी दिली. यातून श्री. नवनीत कावत यांनी जिल्हाभरातील पोलिसांना स्पष्ट संदेश दिला आहे की, गुन्हेगारांची तुम्ही कर्दनकाळ बना, मी सदैव तुमच्या पाठीशी आहे.

## 'ई- पीक'....

सप्टेंबर पर्यंतच होती परंतु ही बाब लक्षात घेऊन आमदार सुरेश धस यांनी लिपिक पाहणीची मदत दहा दिवस वाढवून ३० सप्टेंबर पर्यंत करण्यात यावी अशी मागणी केली त्याबाबत अजित दादा पवार यांनी तात्काळ मान्य करून त्यासंबंधीच्या सूचना जिल्हा प्रशासनाला दिल्या आहेत जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री मा.ना. श्री. अजितदादा पवार साहेब यांच्या अध्यक्षतेखाली मा. विवेकजी जॉन्सन साहेब, मा श्री. जितिनजी रहमान(मुख्य कार्यकारी अधिकारी, मा. श्री. नवनीत कॉवत साहेब (पोलिस अधीक्षक),मा. बजरंग सोनवणे (लोकसभा सदस्य)सर्व विधानसभा, विधानपरिषद सदस्य, यांच्यासह अप्पर, निवासी, उपजिल्हाधिकारी तसेच उपविभागीय अधिकारी यांच्या समवेत मागील आठ दिवसांपासून जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर ते अतिवृष्टीवर ढगफुटी झाली आहे त्याबाबत.. आपत्ती व्यवस्थापन व निवारण यावर महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. यावेळी आष्टी विधानसभा मतदारसंघांमध्ये ढगफुटी व अतिवृष्टी सदृश्य परिस्थिती निर्माण झाल्यामुळे आष्टी व शिरूर कासार तालुक्यातील शेत जमिनी खरडून गेलेले आहेत... उभ्या पिकाचे मोठे नुकसान झालेले आहे....नदीलगतच्या जलसिंचन विहिरी पूर्णपणे बुजलेल्या आहेत (दगडी बांधकाम/सिमेंट रिंग वाहून गेली) बोरवेलचे नुकसान होऊन सोलार विद्युत पंप वाहून जात मोठे नुकसान झाले आहे. ग्रामीण मार्गावरील छोटे नळकांडी पूल, डांबरी रस्ते, वस्ती रस्ते... गाव तलाव,पाझर तलाव मोठ्या प्रमाणावर फुटून शेतकऱ्यांच्या शेताचे नुकसान झालेले आहे. यामध्ये महावितरण विभागाचे विद्युत पोल व रोहित्र पुराच्या अतिउच्च दाबाच्या प्रवाहामध्ये मोठ्या प्रमाणावरती वाहून गेलेले आहे.. आष्टी व शिरूर कासार या तालुक्यात जवळपास ६०० ते ७०० पोल, तारा व शेतकऱ्यांचे सोलार पंप वाहून गेलेले आहेत. शेतकऱ्यांच्या कांदा चाळी जनावरांचे पशुखाद्य मुरघास बॅग, ओला व सुखा चारा पुरामध्ये वाहून गेलेले आहेत.काही ठिकाणी दुधाळ गाई, वासरे व शेळ्या पुरात वाहून गेल्या आहेत व पाण्यामध्ये मृत्यूमुखी पडलेल्या आहेत.त्यांना योग्य मदत व्हावी. प्रामुख्याने कडा शहरांमध्ये छोट्या मोठ्या व्यापाऱ्यांनी भरलेला किराणा माल व इतर साहित्य पुराणे व दुकानात पाणी गेल्याने व्यावसायिकांचं लाखो रुपयांचे नुकसान झालेलं आहे याबाबत नुकसान भरपाई मिळावी. तसेच जिल्हा परिषद शाळा, अंगणवाडी, स्मशानभूमी बाजार ओठे, अंगणवाडी खोली इत्यादी मध्ये पाणी जाऊन व पुरामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. जलसिंचन व लघु पाटबंधारे विभाग अंतर्गत मोठ्या प्रम ाणावरती पाझर तलाव गाव तलाव सांडवे फुटून व भिंती फुटून शेत जमिनीचे नुकसान झाले आहे..आष्टी तालुक्यात सीना, मेहकरी, कांबळी, कडी कोल्हापुरी पद्धत बंधाऱ्याचे आऊट ब्लांकिंग (दोन्ही बाजूचे भराव) फ ुटल्याने नदीपात्रा लगतील शेत खरडून गेलेले आहे व मोठ्या प्रमाणावर शेताचे नुकसान झाल्याचे स्पष्ट आहे. याकरिता जलसंपदा विभागाच्या मेकॅनिकल डिपार्टमेंटच्या माध्यमातून तातडीने या बंधाऱ्यांच्या फुटलेल्या भिंती व भराव दुरुस्त करून वाहून जाणारे पाणी पुढील सिंचनाकरिता साठवणे आवश्यक आहे.याकरिता तातडीने निर्णय व्हावा. यासह राज्य शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या माध्यमातून खरडून गेलेल्या जमिनीकरिता मिळणारे अनुदान हेक्टरी २.५ लक्ष होते.. परंतु मागील काही दिवसांपासून तेच अनुदान ४५-५० हजाराच्या जवळपास दिले जाते तरी हे अनुदान आहे कमी आहे यामध्ये वाढ व्हावी. आष्टी, शिरूर का. तालुक्यातील नदीपात्रालग शेतामध्ये आजही तीन ते चार फूट पाणी आहे त्यामुळे सद्यस्थितीमध्ये त्या ठिकाणी कृषी सहाय्यक,तलाठी व ग्रामसेवक यांनी पंचनामे (स्थळ पाणी करणे) गैरसोयीचे व अशक्य आहे.. त्यामुळे येणाऱ्या आठ दिवसांमध्ये झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याबाबत प्रशासनास कळवावे. शेतकऱ्यांना नुकसान भरपाई करीता ई-पीक पाहणी आवश्यक आहे..तरी ई-पीक पाहणी करण्यासाठी दिनांक २० सप्टेंबर कालावधी दिलेला आहे तरी तो कालावधी दहा दिवस वाढवून ३० सप्टेंबर पर्यंत कालावधी वाढून देण्यात यावा जेणेकरून शेतकऱ्यांना ई-पीक पाहणी करता येईल व झालेल्या नुकसानीची शेतकऱ्यांना भरपाई मिळेल याबाबत महत्त्वाच्या मुद्द्यांवरती मा. उपमुख्यमंत्री यांच्याकडे विनंती केली

◆ पान ४ वरून पुढे...

असता त्यांनी याबाबत तात्काळ मा. जिल्हाधिकारी व संबंधित विभागाचे अधिकारी यांना सूचना केल्या आहेत.

## कोणताही भेदभाव...

नुकसानग्रस्तांना भरपाईसाठी जे प्रस्ताव येतील, त्या प्रस्तावांना तातडीने मंजुरी देऊन नुकसानग्रस्तांना डीबीटीद्वारे त्यांच्या बँक खात्यात नुकसानीची रक्कम जमा करण्यात येईल. जिवीत हानी झाली असेल तर संबंधितांच्या वारसांना तातडीने मदत करण्यात येईल. पुरात वाहून गेलेल्या जनावरांचे शवविच्छेदन करुन त्यांच्या मालकांना देखील त्वरित मदत करण्यात येईल. तसेच ज्या सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाले आहे, त्यांचे वस्तुनिष्ठ पंचनामे करण्यात यावेत. संबंधित विभागाला त्याच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. नाल्यांवरील पुलांसाठी यापुढे गोलपाईपचा वापर न करता चौकोनी बॉक्सचे पाईप वापरण्यात यावेत असे सांगून श्री. पवार पुढे म्हणाले की, त्यामुळे पुलात कचरा अडकणार नाही व पुलाची क्षती होणार नाही. मयतांच्या वारसांना ४८ तासाच्या आत मदत करण्यात यावी. खरडून गेलेल्या जमिनीचे पंचनामे तातडीने पूर्ण करावेत. नागरिकांच्या घरामध्ये पाणी साचून नुकसान झाल्याचे पंचनामे पूर्ण करुन त्यांना मदत देण्यात यावी. शेतकऱ्यांच्या विहिरीत गाळ साचून विहिरी क्षतिग्रस्त झाल्या असल्यास त्याबाबतचे पंचनामे तातडीने पूर्ण करावेत. तसेच कांदाचाळी नुकसानीचे पंचनामे पूर्ण करुन शासन निकषाप्रमाणे बाधितांना त्वरित मदत वितरित करावी. बाधितांना त्वरित म दत मिळण्यासाठी सर्वांनी सर्वोतोपरी कार्यवाही करावी. लोकप्रतिनिधींच्या तक्रारींची तातडीने दखल घेऊन त्यावर कार्यवाही करण्यात यावी. माहे मे २०२५ मध्ये झालेल्या शेती पीक नुकसान भरपाईसाठी प्राप्त २९ कोटी रुपयांचे वाटप शिल्लक आहे. संबधित शेतकऱ्यांची ई केवायसी करून या निधीचे वाटप येत्या ७ दिवसात पूर्ण करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. खासदार श्री. सोनवणे यावेळी म्हणाले की, अतिवृष्टीने वीज वितरण कंपनीच्या मालमत्तेची मोठ्या प्रमाणात हानी झाली आहे. त्याच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. क्शन मोडवर नुकसानीचे पंचनामे करण्यात येऊन नुकसानग्रस्तांना तातडीने मदत करण्यात यावी, अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली. आमदार धनंजय मुंडे म्हणाले, ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात झालेल्या पीक नुकसानीचे, सार्वजनिक मालमत्तेच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्यात यावेत. शेतकऱ्यांना वेळेत नुकसान भरपाई मिळाली पाहिजे, असे ते म्हणाले.

## ओला दुष्काळ....

काही दिवसात बीड जिल्ह्यात सर्वत्र अतिवृष्टी काही ठिकाणी ढगफुटी सदृश्यस्थिती निर्माण झाल्यामुळे शेतीचे सर्व पिकांचे १००% नुकसान झालेले आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारची पाहणी किंवा पंचनाम्याचा फार्श न करता सरसकट सर्व शेतकऱ्यांना ७/१२ नुसार हेक्टरी ५० हजार रुपये आर्थीक मदत तात्काळ देण्यात यावी. तसेच ज्या शेतकऱ्यांनी पीक विमा भरलेला आहे त्या शेतकऱ्यांना १००% नुकसानीचा विमा मोबदला देण्या संबंधीत संबंधीत कंपनीला आदेशीत करावे व २५% अग्रीम रक्कम तातडीने त्यांच्या खात्यावर जमा करावा. तसेच मागील ८ महिन्यात राज्यातील १२८८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याअसुन बीड जिल्हा सर्वात जास्त शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्हा आहे.शेतकऱ्याची आर्थीक परिस्थती दयनीय आहे. अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे १००% पीक वाया जाणार असुन शेतकऱ्याचे भविष्य अंधकारमय झाले आहे. शेतकऱ्याला आर्थीक मदत देवुन जगण्यासाठी आशेचा किरण शासनाने देणे आवश्यक आहे. मानसिक व आर्थीक आधार देणे तात्काळ गरजेचे आहे. अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील अनेक नागरिकांचे घरांची पडझड व पशुधनांची मृत्यु होणे वाहुन जाणे अशी प्रकार घडलेले आहेत. तसेच नागरिक वाहुन गेलेले आहेत, मृत्यु झालेले आहेत. या सर्वांना तात्काळ मदत देण्यात यावी.

## अतिवृष्टीने जिल्ह्याला...

ओलांडल्याने शेतात पाणी शिरल आहे. शिवाय जमीन खरडून गेल्या आहेत. यामुळे पिकांचे आणि शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. याच बरोबर काही भागात घरांची पडझड देखील झाली आहे. आष्टी तालुक्यात पुराचे पाणी घरात घुसून संसारोपयोगी साहित्याचेही नुकसान झाले आहे. यामुळे शासनाने तातडीने स्पॉटवर जावून पंचनामे करावेत, व सरसकट नुकसान भरपाई द्यावी, असे पत्रात म्हटले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com




# प्रश्न विचारणारा नागरिक तयार झाला तरचं लोकशाही टिकेल : ॲड. अजित देशमुख

**बीड । प्रतिनिधी**

देशात लोकशाही टिकवायची असेल तर लोकशिक्षण आणि लोकजागृतीची आवश्यकता आहे. त्यामुळे स्वराज्य जनजागृती परिषदेच्या कार्यकर्त्यांनी या मुद्द्यावर जनतेत जाऊन काम करावे. जागरूक नागरिक तयार झाला पाहिजे. देशातल्या लोकशाहीच्या संवर्धनासाठी प्रश्न विचारणारा नागरिक तयार झाला, तरच लोकशाही टिकेल, असे स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष ॲड. अजित एम. देशमुख यांनी म्हंटले आहे. परिषदेचे उपाध्यक्ष संदीप जगताप, सातारा यांनी परिषदेचे उद्देश काय आहेत, यावर विस्तृत मार्गदर्शन करत या माध्यमातून लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी संघटित पणाने काम करण्याचे आवाहन केले. तर परिषदेचे कोषाध्यक्ष शिवाजी खेडकर, पुणे यांनी शेतकरी, विद्यार्थी आणि महिलांच्या प्रश्नावर गंभीरपणे विचार करण्याची वेळ आली आहे, असे म्हटले. परिषदेचे सचिव तुषार पाटील, सहसचिव अरुण बोबडे, धाराशिव, विश्वस्त गोवर्धन मस्के, बीड आणि विष्णू ढवळे पैठण यांनीही कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे गोकुळ सुरासे वैजापूर, बालाजी गायकवाड परळी, विशाल पांढरे जातेगाव यांनीही आपले विचार व्यक्त केले. आभार प्रदर्शन नाईकवाडे यांनी केले तर कार्यक्रमाचे उत्कृष्ट असे सूत्रसंचालन विजयकुमार गाडेकर, शिरूर कासार यांनी केले. मराठवाड्यातील आठही जिल्ह्यातून सव्वा दोनशे कार्यकर्ते या मेळाव्याला उपस्थित होते. सक्रिय कार्यकर्त्यांची ही फळी निश्चितच परिवर्तन घडवून आणेल, असा विश्वास यावेळी कार्यकर्त्यांमध्ये व्यक्त करण्यात येत होता. मेळाव्याला सव्वा दोनशे कार्यकर्ते असणे, ही फार मोठी जमेची बाजू आहे, असे मतही यावेळी व्यक्त करण्यात येत होते. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.



# शालेय साहित्य, गरिबांना किराणा किट वाटप हे माझे सामाजिक कार्य : सिमा ओस्तवाल

**गुरु आनंद महिला प्रतिष्ठाण, बीड आयोजित प्रयास फाऊंडेशन, मुंबई शालेय साहित्य वाटप**

**बीड । प्रतिनिधी**

बीड येथील गुरु आनंद महिला प्रतिष्ठाण, बीड आयोजित प्रयास फाऊंडेशन, मुंबई यांच्या सहकार्याने माय छोटा स्कूल बीड या ठिकाणीमोफत शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. वार रविवार दि. १४.०९.२०२५. रोजी सकाळी १०.०० वा.आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्ष सौ. सिमा मनोज ओस्तवाल (अध्यक्ष गुरु आनंद महिला प्रतिष्खाण, बीड.) या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा.श्री. चंद्रकांत शेळके साहेब (तहसीलदार बीड) बाळासाहेब पिंगळे मा. जिल्हा प्रमुख तसेंच प्रमुख उपस्थितीत यावेळी मा.श्री. सुरेश तात्या शेटे, मा.श्री. झुंजार धांडे, मा.श्री. भिकू शिंदे, सो. रुक्मिण ताई नागापुरे , आयेशा रफिक शेख , मा.श्री. भागवतजी वैद्य सर, मा.श्री. लक्ष्मण इंगोले , मधुकर धांडे, सों. मोनिका शिंदे मॅडम, सों. विद्या धन्वे मॅडम, सॉ. ज्योती चव्हाण मॅडम, सों. गीता चव्हाण मॅडम सौ. पूजा पिंगळे मॅडम (प्रिन्सिपॉल माय छोटा स्कूल बीड)लक्ष्मण ठापुर, जाजदर पन्हाळकर, अंकुश



आगछे संदीप आदमाणे चंद्रसेन मन्यारी, आओमप्रकाश कराय बाबा पंडीत माऊली तपाये.उपस्तित होते. यावेळी प्रमुख पाहुणे यांची भाषणे झाली. शेवटी कार्यक्रम चे अध्यक्ष सिमा ओस्तवाल मॅडम यांनी आपल्या भाषणात सांगितले की, मी आतापर्यंत एक लाख पाटी, पेन, पेन्सिल, वह्या वाटप केल्या आहेत. अजूनही प्रोग्राम सुरूच आहेत. दीपावली निमित्त गोरगरीब लोकांना किराणा किट देखील वाटप करून गरिबांची दीपावली गोड आणि आनंदात साजरी करण्याचे भाग्य मला मिळते. यासारखे दान देणाऱ्यांनी पुढे यावे. या निमित्ताने सांगावसे वाटते. हे काम माझे एकट्याचे नाही. आपण सर्व जण मिळून करू असे ही यावेळी सीमा मॅडम यांनी म्हंटले. या शालेय साहित्य वाटप प्रोग्राम साठी मोठया संख्येने विध्यार्थी पालक उपस्तित होते.

# शिक्षक सह.पतसंस्थेचे वतीने कु.धनश्री राऊत चा सत्कार संपन्न



**माजलगाव । प्रतिनिधी**

शिक्षक सहकारी पतसंस्था मर्या.माजलगावचे वतिने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्काराचे आयोजन दि.१४ सप्टेंबर २०२५रविवार रोजी सकाळी ११वा.येथील जि.प.कन्या प्रशालेत करण्यात आले होते. यावेळी कु.धनश्री रविंद्र राऊत हिने MBBS मध्ये स्वामी रामानंद तीर्थ शासकीय महाविद्यालय अंबाजोगाई येथे प्रवेश निश्चित झाला आहे. त्याबद्दल तिचा सत्कार करताना माजी जि. प.समाजकल्याण सभापती अनुसया सोळुंके यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी पतसंस्थेचे चेअरमन रमेश फपाळ,आरबेसर,काळे सर व इतर शिक्षक व विदयार्थी व पालक वर्ग मोठ्याप्रमाणात हजर होते.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात लवकरच भूमिका स्पष्ट करणार: विजय साळवे



**● रिपब्लिकन सेनेचा पक्ष प्रवेश सोहळा माजलगाव येथे उत्साहात संपन्न**

**माजलगाव। प्रतिनिधी**

रिपब्लिकन सेना बीड जिल्हा अध्यक्ष विजय साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवार, दि. १६ सप्टेंबर २०२५ रोजी माजलगाव शहरातील व्यंकटेश हॉटेल येथे पक्षाची महत्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस तालुका सल्लागार विलास गायसमुद्रे यांच्या अध्यक्षतेखाली मार्गदर्शन करण्यात आले. बैठकीदरम्यान पात्रुड सर्कल मधील अनेक कार्यकर्त्यांनी रिपब्लिकन सेनेत जाहीर प्रवेश करून पक्ष बळकट करण्याचा निर्धार व्यक्त केला. त्याचबरोबर पात्रुड सर्कल अध्यक्षपदी गणेश ढगे यांची निवड करण्यात आली. सय्यद मुजाहेद, सय्यद सज्जाद, सय्यद शकिल यांसह इतर कार्यकर्त्यांनी पक्ष प्रवेश करून समाजहितासाठी कार्य करण्याचा संकल्प केला. बैठकीत पक्ष संघटन अधिक मजबूत करण्यावर, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि विविध कार्यक्रमांचे नियोजन याबाबत सविस्तर चर्चा झाली. जिल्हा अध्यक्ष विजय साळवे यांनी प्रत्येक घटकापर्यंत पोहोचून समाजातील एकजूट वाढविणे आणि सामाजिक बांधिलकी जोपासणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. आगामी निवडणुकांसंदर्भात पक्ष लवकरच आपली भूमिका जाहीर करणार असल्याची माहिती त्यांनी दिली. या कार्यक्रमास वशिष्ठ लांडगे, वैजनाथ गडसिंग, सय्यद अन्वर भाई, संतोष पुणे, विश्वनाथ तोडके, सुरेश साळवे, निवृत्ती गायकवाड, अर्जुन परसे, लक्ष्मण काशीद, मुकुंद खरात, गणेश ढगे, विशाल ससाने, सय्यद नाजेर, सय्यद शकन, सय्यद अनवर जिलानी कुरेशी, शेख राजू यांसह स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित सर्वांनी एकजूट राखून समाजाच्या प्रगतीसाठी आणि पक्षवाढीसाठी काम करण्याचा संकल्प केला.

# धोकादायक व मोडकळीस आलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळांना २१ कोटी ५० लाख रुपयांचा निधी मंजूर

**मराठवाडा मुक्ती संग्रामदिनी पालकमंत्री अजितदादांचा ताफा अडवण्याचा दिला होता इशारा : डॉ. गणेश ढवळे**



**बीड । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात टाकून ज्ञानार्जन सुरू आहे. या गंभीर परिस्थितीवर उपाय म्हणून शिक्षण विभागाने २ वर्षांपासून १४ कोटी ८५ लाख रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे पाठवला होता मात्र निधी मिळत नव्हता. मात्र गेल्या ९ महिन्यांपासून वारंवार निवेदनं व आंदोलनं करूनही कोणताही ठोस निर्णय झाला नाही. त्यामुळे सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख - बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य - डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी पालकमंत्री अजित पवार यांच्या गाडीसमोर उडी मारून ताफा अडवण्याचा इशारा मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी होणाऱ्या रेल्वे कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाला लेखी निवेदनाद्वारे दिला होता. आंदोलनाच्या केवळ एक दिवस आधीच प्रशासनाने शाळांसाठीचा मोठा निधी मंजूर केल्याचे लेखी पत्र भगवान फुलारी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद बीड यांनी डॉ. ढवळे यांना दिले.



## जाहीर प्रगटन

**मा. माणिकराव रा. सातव ७ वे सह. दिवाणी न्यायाधीश,व.स्तर, बीड यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज नंबर १०८० / २०२५

उज्वला साधु कदम वि. निरंक

अर्जदार – १. उज्वला भ्र. साधु कदम, वय: ४९ वर्षे, धंदा शेती, रा. वाटसावळी, ता. जि. बीड, २. संकेत पि. साधु कदम, वय: ४९ वर्षे, धंदा शेती, रा. सदर, ३. निखील पि. साधु कदम, वय: २२ वर्षे, धंदा शेती, रा. सदर, ४. सखुबाई भ्र. किसन कदम, वय ८३ वर्षे धंदा शेती रा. सदर

विरुध्द

गैरअर्जदार– निरंक

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत साधु पि. किसन कदम यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी साधु पि. किसन कदम, मृत्यु दि. ०४/०२/२०२५ रोजी राहते घरी रा.घाटसावळी, ता. जि. बीड येथे मयत झाले असूनअर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असुन, अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे मुले आहेत व अर्जदार क ४ ही मयताची आई आहे. यांना अर्जदाराव्यतिरिक्त ईतर कुणीही वारस नाहीत.

वरील अर्जदार यांना शासकीय व खाजगी कामासाठी वारस प्रमाणपत्र याची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नाही असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना सदरहू मयत – साधु पि. किसन कदम, यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २१/०८/२०२५ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाचे शिक्याने दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ०३/१०/२०२५ आहे.

(मार्फत– ॲड. वाय.आर.शेळके)

शिक्का | (स्वाक्षरीत) क. लिपीक | (स्वाक्षरीत) सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय, क.स्तर, बीड



# बीड जिल्ह्यात मुसळधार पावसाचा हाहाकार; शेतीचे प्रचंड नुकसान - सरकारकडे आर्थिक मदतीची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

मागील तीन दिवसांपासून बीड जिल्ह्यात मुसळधार पावसाने थैमान घातले असून, विशेषतः केज तालुका आणि आसपासच्या भागात शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. पावसामुळे उभ्या पिकांवर पाणी साचल्याने शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून, शेतकरी अडचणीत आले आहेत.

या पार्श्वभूमीवर महाएनजिओ फेडरेशन महाराष्ट्र राज्यचे बीड जिल्हा समन्वयक बाजीराव ढाकणे यांनी राज्य सरकारकडे शेतकऱ्यांना तातडीने हेक्टर १ लक्ष रुपये आर्थिक मदत जाहीर करण्याची जोरदार मागणी केली आहे.

शेतीचे झालेले नुकसान पाहता प्रशासनाने तातडीने पंचनामे करून सरसकट नुकसानभरपाई जाहीर करावी. फक्त आश्वासने न देता शेतकऱ्यांच्या खात्यावर हेक्टरी १ लक्ष रुपये थेट मदत जमा होणे अत्यावश्यक आहे, असे बाजीराव ढाकणे यांनी सांगितले.

बीड जिल्ह्यातील अनेक भागांत सोयाबीन, कापूस, भाजीपाला, मूग, ऊस आणि तूर यासारखी पिके पाण्याखाली गेली आहेत. काही ठिकाणी मातीचा थर वाहून गेल्याने शेताची गुणवत्ता देखील खराब झाली आहे. यामुळे आगामी हंगामावरही परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.


जनावरांचे देखील नुकसान: पावसामुळे अनेक शेतकऱ्यांचे जनावरे, शेती उपकरणे, साठवलेले धान्य व खताचे साठे देखील नष्ट झाले आहेत. अनेक कुटुंबांना आपल्या शेतवस्त्यांवरून गावात स्थलांतर करावे लागले आहे.

सरकारने तातडीने उपाययोजना कराव्यात: बाजीराव ढाकणे यांनी पुढे सांगितले की, सरकारने या संकटाची गांभीर्याने दखल घेऊन, जिल्हा प्रशासनामार्फत युद्धपातळीवर मदतकार्य सुरू करावे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना फक्त आधार नव्हे, तर थेट मदतीची गरज आहे.

या भागात अजूनही हवामान ढगाळ असून पुढील काही दिवस पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. प्रशासनाने मदतकार्याची गती वाढवावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

# बालाघाटावर अतिवृष्टीने नुकसान झालेल्या पिकांची तात्काळ नुकसान भरपाई द्यावी : अशोक लोढा

**बीड । प्रतिनिधी**



मागील दोन दिवसापासून बीड जिल्ह्यामध्ये अतिवृष्टीने थैमान घातले असून काढणीला आलेल्या मुग, उडीद, धने, तीळ, सोयाबीन, कापूस आदी पीक संपूर्णतः पाण्यामध्ये बुडून शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. तसेच फळबागांना सुद्धा अतिवृष्टीचा जोरदार फटका बसला असून अनेक ठिकाणी पाणी साचल्यामुळे बागा उध्वस्त झाल्या आहेत. बालाघाटावर अतिवृष्टीमुळे सर्व पिके नष्ट झाली असून १००% नुकसान झालेले आहे.

या हंगामामध्ये मे महिन्यामध्ये अवकाळी पावसाला सुरुवात झाली. शेतकरी वर्गाला मशागतीला ही वेळ मिळाला नाही आहे त्या परिस्थितीमध्ये कर्ज घेऊन रात्रीचा दिवस करून पेरणी केली. काही का होईना पीक पदरात पडेल अशा आशेवर शेतकरी राजा काम करत होता. परंतु या झालेल्या अतिवृष्टीमुळे पेरणीचा खर्चही निघणे मुश्किल झाले आहे या उलट पुढील हंगामासाठी होणाऱ्या खर्चाची तरतूद कशी करावी या चिंतेत सध्या शेतकरी वर्ग आहे. सर्व संकटातून शेतकऱ्याला बाहेर काढण्यासाठी शासनाकडून मदतीचा हात मिळणे गरजेचे आहे त्या करीता सरसकट पिकाचे १००% नुकसान गृहीत धरून भरपाई देण्याबाबत तात्काळ कारवाई करण्यात यावी.

# माजलगाव बाजार समिती कै.वसंतरावदादा पाटील स्मृती पुरस्काराने सन्मानित : उपसभापती श्रीहरी मोरे यांनी स्विकारला पुरस्कार

**माजलगाव। प्रतिनिधी**

येथील कृषि उत्पन्न बाजार समितीला उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाच्या वतीने संघाचे संस्थापक वसंतरावदादा पाटील स्मृती पुरस्कार २०२५ ने सन्मानित करण्यात आले असुन उपसभापती श्रीहरी दिगंबरराव मोरे यांनी पुणे येथे दि. १६ सप्टेंबर २०२५ रोजी संघाच्या



सर्वसाधारण सभेत हा पुरस्कार स्विकारला. यावेळी संचालक आसाराम घायतिडक, भगवान आगे, आबाजी भोसले, संजय कचरे, सचिव एच. एन. सवणे, लेखापाल उध्दव फपाळ, नितीन पौळ, सुमित पौळ, गणपतराव कदम, दिनानाथ शेंडगे यांची



## जाहीर प्रगटन

**मा.श्री आर. जी. बागडे साहेब, ६वे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, बीड यांचे न्यायालयात**

किरकोळ दिवाणी अर्ज १३९२/२०२५

विशाखा विरुद्ध निरंक

अर्जदार – १. विशाखा भ्र. मधुकर चके,५४ वर्षे, धंदा – घरकाम, रा. मानगाव, ता. जि. रायगड. ह.मु. भगवान विद्यालयाच्या पाठीमागे, तक्षशिल नगर, बीड ता. जि. बीड. २. मयुरेश पि. मधुकर चके, वय– ३४ वर्षे, धंदा– नौकरी, रा. कॅाॅल रोड, डी. वाय. एस. पी. ऑफिस, मानगाव ता. जि. रायगड. ३. कांती भ्र. विनोद संगारे, वय ४२ वर्षे, धंदा नौकरी, रा. मातोश्री चौक, जानकी नगर, मनिषा नगरच्या पाठीमागे, कलवा पश्चिम, ठाणे ता. जि. ठाणे. ४. पुनम भ्र. श्रीकुमार आचार्य, वय – ४० वर्षे, धंदा – नौकरी, रा. झिवर पार्क, सीएचएस, कोळखे हॉटेल जवळ, पनवेल ता. जि. पनवेल.

विरुद निरंक

मागणी – बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत मधुकर पि. गुणाजी चके मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत मधुकर पि. गुणाजी चक्रे यांचा मृत्यु दिनांक ११ / १२ / २०२१ रोजी झाला आहे. वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत मधुकर पि. गुणाजी चके यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत मधुकर पि गुणाजी चके यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक ११/०९/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १८/१० / २०२५ आहे.

(मार्फत– ॲड. राधाकृष्ण पंडित)

शिक्का | (स्वाक्षरीत) क. लिपीक | (स्वाक्षरीत) सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय, क.स्तर,बीड

दैनिक मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर
• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • बुधवार, दि. १७ सप्टेंबर २०२५ • पान ४

# भर पावसाळ्यात कड्याच्या कोल्हापूरी बंधाऱ्याचे दरवाजे बंद ठेवल्याने बंधाऱ्याचे नुकसान

**कडा । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील कडा येथील कोल्हापूरी बधाऱ्याचे भर पावसाळ्यात लोखंडी दरवाजे बंद ठेवल्याने पाण्याच्या प्रवाहाने बंधाऱ्यांच्या लोखंडी दरवाज्याच्या चौकटी (फ्रेम) अक्षरशः लाकडा सारखे तुकडे तुकडे होऊन तुटून खाली पडले. हा बंधारा बनवल्या पासून यावर देखरेख करण्यासाठी नेमलेल्या संबंधित कार्यालय - अधिकारी यांचे कायमच दुर्लक्ष राहिले आहे. कारण सगळा मनमानी कारभार सुरू असल्याचे दिसून येते. पावसाळ्यात बंधाऱ्याचे दरवाजे बंद का ? पावसाळा संपल्यानंतर वेळ मिळेल तेव्हा उघडे ठेवलेले दोन ते तीन दरवाजे बंद करतात. या बंधाऱ्याचे दरवाजे जरी पावसाळा संपत आल्यावर लावले तरी जवळपास सर्वच दरवाज्यातून मोठ्या प्रमाणात पाणी गळती होते म्हणून बंधाऱ्यातील पाणी साचून न राहता सगळेच पाणी थोड्याच दिवसात वाहुन जाते व बंधारा कोरडा पडतोय. यावर उपाययोजना योजना करण्यात यावे म्हणून संबंधित अधिकाऱ्यांना कित्येकदा लेखी तसेच तोंडी विनंती केली होती. परंतु आजपर्यंत कायमस्वरूपी उपाययोजना काहि केली नाही. थातुरमातुर कामे करून वेळ काढु पणा करत आहे. यावेळी तर चक्क पावसाळ्यात दरवाजे बंद करून ठेवल्याने या कोल्हापूरी बंधाऱ्याचे तुटफुट होऊन पुर्णतः नुकसान झाले आहे. हे फक्त संबंधित अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले म्हणून इतके नुकसान झाल्याची चर्चा नागरीक,शेतकरी यांच्या होत आहे.



# ओला दुष्काळ जाहीर करुन बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये भरपाई व २५% अग्रीम पिक विमा तातडीने द्यावा

## अँड. राज पाटील यांची जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन मागणी केली



**वडवणी । प्रतिनिधी**

काही दिवसापासून बीड जिल्ह्या मध्ये अतिवृष्टीजन्य पाऊस झाल्याने शेतीचे १००% नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयाची भरपाई व २५% अग्रीम पिक विमा तातडीने द्यावा. अशी मागणी लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे संस्थापकीय अध्यक्ष तथा मौजे तीगांवचे आदर्श सरपंच अँड. राज पाटील यांनी बीड जिल्हाधिकारी यांना लेखी निवेदन देऊन मागणी केली आहे. निवेदनात असे म्हटले आहे की, मागील ▶ उर्वरित पान २ वर

# अंमळनेर मध्ये अतिवृष्टीचा फटका तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना मदतीची

**पाटोदा । प्रतिनिधी**

आष्टी मतदार संघात मुसळधार पावसाने हाहाकार माजवला असून पाटोदा तालुक्यातील अंमळनेर जिल्हा परिषद गटात अतिवृष्टीमुळे नद्या नाले विहिरी तुडुंब भरून वाहत आहेत. त्यामुळे अनेक घरांमध्ये पाणी शिरल्याने अनेकांचे संसार उध्वस्त झाले आहेत. तसेच शेती पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. झालेल्या नुकसानीचे व पिकांचे पंचनामे करून अहवाल जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाला व विमा कंपन्यांना लवकरात लवकर सादर करावा अशी मागणी प्रशासनाला केली आहे. गेल्या दोन-तीन दिवसात महाराष्ट्रात अतिवृष्टीच्या पावसामुळे दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाल्याने अनेक गोरगरीब शेतकऱ्यांचे संसार उध्वस्त झाले आहेत. शेतकऱ्यांच्या घरासह पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे महसूल विभागाच्या आणि कृषी विभागाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पंचनामे करावीत तसेच घरांचे स्थळ पंचनामे करून त्याचा अहवाल राज्य शासनाला पाठवा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते भाऊसाहेब भवर यांनी केली आहे.

# मोगरा गावाला पाण्याचा विळखा ; गावाचा संपर्क तुटला

## कापूस सोयाबीन पिके धोक्यात ; प्रशासनाने तातडीने उपाययोजना करण्याची गरज



**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील मोगरा या गावाला सिंदफणा व गोदावरी नदीपात्रातून येणाऱ्या पाण्यामुळे महापूर आला असून या गावाला पाण्याचा वेळ का पडल्याने गावाचा संपर्क तुटला असून परिसरातील कापूस सोयाबीन पिके धोक्यात आली आहेत प्रशासनाने तातडीने उपाययोजना करण्याची मागणी मोगरा ग्रामस्थांनी केली आहे.

मागील तीन ते चार दिवसापासून सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे माजलगाव धरण १००% भरले असल्याने धरणातील पाणी सिंदफणा नदी पात्रातून दहा दरवाजे उघडून सोडण्यात आले आहे तर पैठणचे धरण देखील भरले असल्यामुळे गोदावरी नदी पात्रातून ते पाणी सोडण्यात आले आहे मोठ्या प्रमाणावर सोडण्यात आलेल्या पाण्यामुळे महापूर आला आहे तालुक्यातील सांडस चिंचोली गावाला देखील या पाण्याचा विळखा आहे तर मोगरा गावात येण्यासाठी असणारा लिमगाव खडकी चा नवीन पूल देखील पाण्याखाली गेलेला असल्यामुळे मोगरा गावाचा संपर्क तुटला आहे या खडकेच्या पुलावर दोन मीटर पाणी तर नवीन केलेला फुल पाण्याखाली गेला आहे सर्व दूर पाणीच पाणी झालेले असून दोन्ही ठिकाणचे मार्ग बंद झाल्यामुळे गावकऱ्यांना बाहेर पडणे अशक्य झाले आहे. गावाला जात असलेल्या शेतातील कापूस सोयाबीन पिके पाण्याखाली गेली असून जमीन खरडून गेली आहे. प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून उपाययोजना करावी अशी मागणी ग्मोगरा ग्रामस्थांनी केली आहे.

दरम्यान प्रशासनाने भयभीत झालेल्या ग्रामस्थांना दिलासा द्यावा अशी मागणी होत आहे. दरम्यान प्रशासनाने भयभीत झालेल्या ग्राम स्थांना दिलासा द्यावा अशी मागणी होत आहे.

### बीड रेल्वेला नारायणगड एक्स्प्रेस असे नाव देण्यात यावे – संतोष घोडके

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्य़ातील अत्यंत आवश्यक व महत्त्व असलेल्या बीड -अहिल्यानगर चालु होत असलेल्या रेल्वेला महाराष्ट्रातील धाकटी पंढरी* म्हणून ओळख असलेल्या व सर्व आठरा पगड जाती धर्मातील श्रद्धास्थान असलेले *श्रीक्षेत्र नारायणगड एक्स्प्रेस* असे नाव देण्यात यावे नारायणगड हे बीड येथील प्रसिद्ध असे देवस्थान असुन ह्या ठिकाणी विठ्ठल रुक्मिणी ची पुरातन अशी मूर्ती अहे तसेच ह्या ठिकाणीच नगद नारायण महाराज यांची जिवंत समाधी असुन पंचक्रोशीतील लाखो भक्तांचे श्रद्धास्थान आहे तसेच जिल्ह्यासह जिल्ह्य़ाबाहेरील भक्त आहेत.म्हणून अश्या पवित्र व सर्वांचे श्रद्धास्थान असलेल्या नारायणगडाचे नाव हे आपल्या बीड जिल्ह्य़ातून धावणाऱ्या पहिल्याच रेल्वेला नारायणगड एक्स्प्रेस असे नाव देण्यात यावे.. असी मागणी संतोष घोडके यांच्याकडून करण्यात आली.

# अतिवृष्टीने जिल्ह्याला झोडपले; नुकसानीचे तातडीने पंचनामे करा

## खा.बरजंग सोनवणे यांचे पालकमंत्री अजित पवार यांना पत्र

**बीड । प्रतिनिधी**

सलग दोन दिवस बीड जिल्ह्यावाशीयांना अतिवृष्टीने झोडपले आहे. यामुळे जिल्ह्यातील सर्व नद्या दुथडी भरून वाहत आहेत. परिणामी, शेतकऱ्यांचे प्रचंड मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक भागात पिके पाण्यात असून काही ठिकाणी नदीपात्राशेजारील जमीनी देखील खरडून गेल्या आहेत. शिवाय घरांची देखील पडझड झालेली असून नुकसानीचे तातडीने पंचनामे करून सरसकट नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली आहे.

पालकंत्री पवार यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे, बीड जिल्ह्यात सलग पावसामुळे अनेक ठिकाणी पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. सकाळी सात वाजल्यापासून स्वत: परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे. बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील कडा गावातील ११, चोभा निमगावातील १४, घाटा पिंपरीतील ७, पिंपरखेडातील ६, धानोऱ्यातील ३ व डोंगरगणमधील ३ नागरिक असे मिळून ४४ लोक अडकलेले होते. याच बरोबर जिल्ह्यातील बीड तालुक्यातील नाळवंडी, नेकनूर, येळंबघाट, आष्टी तालुक्यातील दौलावडगाव, धानोरा, कडा, पिंपळा, टाकळसिंग, दादेगाव, अंबाजोगाई तालुक्यातील लोखंडी, पाटोदा, केजमधील केज, यूसूफ, होळ, शिरूर तालुक्यातील शिरूर महसूल मंडळात अतिवृष्टीची नोंद आहे. आष्टी तालुक्यात तर कडा आणि परिसरात ढगफुटीसदृस्य पाऊस झालेला आहे. कधी नव्हे ते नदीला मोठा पुर आला. यामुळे जनजीवन विस्कळीत झाले होत. तर अनेक भागात मुसळधार पावसामुळे विविध नद्यांच्या पाण्याने पात्र ▶ उर्वरित पान २ वर



## थोडक्यात...

### आयुष्मान कार्डचे जलद गतीने वितरण करा : उपमुख्यमंत्री अजित पवार

**बीड । प्रतिनिधी**

शासनामार्फत राबविल्या जाणाऱ्या विस्तारित आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचा लाभ प्रत्येक लाभार्थ्यापर्यंत पोहोचविण्यासाठी आयुष्मान कार्डचे जलद गतीने वितरण करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांनी दिले. आज जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात विस्तारित आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या आढावा जिल्हास्तरीय पालक जन आरोग्य संरक्षण कार्यकारिणीच्या बैठकीत घेताना उपमुख्यमंत्री श्री. पवार बोलत होते.

### मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त हुतात्म्यांना आदरांजली व ध्वजारोहण सोहळा

**बीड । प्रतिनिधी**

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त दि. १७ सप्टेंबर, २०२५ रोजी बीड येथे हुतात्म्यांना आदरांजली अर्पण करण्याचा व ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय सोहळा आयोजित करण्यात आला आहे. प्रियदर्शनी उद्यान येथे सकाळी ८.२५ वाजता हुतात्म्यांना आदरांजली अर्पण करण्यात येणार असून सकाळी ९.०० वाजता पोलीस मुख्यालय मैदान, बीड येथे महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार ध्वजारोहण करून उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी श्री. विवेक जॉन्सन यांनी नागरिकांनी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन केले आहे.

### पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांचा बीड दौरा कार्यक्रम

**बीड । प्रतिनिधी**

पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांचा बीड जिल्हा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. बुधवार दि. १७ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १०.४५ वाजता किंनगाव ता. फुलब्री येथून हेलीकॅप्टरने बीडकडे प्रयाण. दुपारी १२.०० वाजता बीड येथे आगमन व रेल्वेस्टेशन पालवण रोड येथे स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान कार्यक्रमास उपस्थिती. दुपारी १२.३० वाजता बीड ते अहिल्यानगर रेल्वे सेवेच्या शुभारंभ व विविध कार्यक्रमास उपस्थिती. दुपारी ३.०० वाजता हॉटेल ग्रॅड यशोदा,बार्शी रोड बीड येथे जिल्हा पत्रकार संघ (महाराष्ट्र) आयोजित शैक्षणिक क्षेत्रातील विविध पुरस्काराचे वितरणास उपस्थिती. सायंकाळी ५.३० वाजता शासकीय विश्रामगृह येथे बीड,आष्टी, गेवराई मतदार सघातील अभ्यांगतांच्या भेटीसाठी राखीव. सायंकाळी ९.३० वाजता यश:श्री निवासस्थान येथे आगमन व राखीव. गुरुवार दि. १८ सप्टेंबर २०२५ रोजी शासकीय विश्रामगृह परळी वैद्यानाथ जि. बीड येथे सकाळी ११.०० वाजता परळी मतदार संघातील अभ्यांगतांच्या भेटीसाठी राखीव.दुपारी १.१५ वाजता शासकीय वाहनाने अंबाजोगाई येथे जि. बीडकडे प्रयाण. दुपारी १.३० वाजता पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त नागरी रुग्णालय, मंडी बाजार अंबाजोगाई येथे भाजपाच्या वतीने सेवा पंधरवाडा अंतर्गत आरोग्य तपासणी शिबीराचे उद्घाटनास उपस्थिती. दुपारी २.४५ ते ५.४५ पर्यंत गणेश कराड (जिल्हा सरचिटणीस भाजपा) यांच्या निवासस्थानी अभ्यांगतांच्या भेटीसाठी राखीव. सायंकाळी शासकीय वाहनाने परळी वैद्यनाथ जि. बीडकडे प्रयाण. ६.३० वाजता यश:श्री निवासस्थानी आगमन व राखीव.

### ५० टक्के व्याज माफ सवलत योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाच्या थकीत कर्ज प्रकरणात संपुर्ण थकीत कर्ज रक्कमेचा एकरक्कमी भरणा करण्याऱ्या लाभार्थ्यास थकीत व्याज रक्कमेत ५० टक्के सवलत देण्यातबाबतची एकरकमी परतावा योजना दि. ३१ मार्च २०२६ पर्यंत राबविण्यात येत आहे. महामंडळाच्या थकबाकीदार लाभार्थीनी सदर योजनेचा फायदा घेऊन कर्जमुक्त व्हावे, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक श्री.बी.एस. भोसले, यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी महामंडळाच्या बीड जिल्हा कार्यालयाशी ०२४२-२३२६२४ या क्रमांकावर संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

### दिव्यांगासाठी मोफत संगणकीय व व्यावसायिक प्रशिक्षणाचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद, पुणे व सांगली अंतर्गत कार्यरत शासकीय प्रौढ दिव्यांग प्रशिक्षण केंद्र व वसतिगृहात सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी मोफत प्रवेश देण्यात येणार आहेत. गरजू दिव्यांगानी या सुवर्ण संधीचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. प्रशिक्षण केंद्रात सर्टिफिकेट इन कॉम्पुटर ऑपरेशन वुईथ एम.एस. ऑफिस (संगणक कोर्स) यासाठी शैक्षणिक पात्रता किमान इ. ८ वी पास असावी. मोटार अँन्ड आमेंचर वायडींग, सबमर्सिबल पंप सिंगल फेज, (इलेक्ट्रीक कोर्स) यासाठी शैक्षणिक पात्रता किमान इ. ९ वी पास असावी. उमेदवाराचे वय १६ ते ४० वर्षे असावे. प्रशिक्षण कालावधी हा एक वर्षाचा असणार आहे. प्रशिक्षण कालावधीत राहण्याची, जेवणाची व प्रशिक्षणाची मोफत सोय करण्यात आली असून अद्यावत व परीपूर्ण संगणक कार्यशाळा, भरपूर प्रॅक्टीकल्स व व्यवसायाभिमुख मोफत प्रशिक्षण, नेटवकींग व इंटरनेटची सुविधा, अनुभवी व तज्ञ निदेशक, उज्वल यशाची परंपरा, समाज कल्याण विभागाकडून स्वयंरोजगारासाठी व्यवसायासाठी बीज भांडवल आदी सोयी सुविधा देण्यात येणार आहेत. उमेदवारांनी त्यांचे प्रवेश अर्ज अधिक्षक, शासकीय प्रौढ दिव्यांग प्रशिक्षण केंद्र व वसतिगृह, टाकळी रोड, म्हेत्रे मळा, गोदड मळ्या जवळ, मिरज ता. मिरज जि. सांगली येथे प्रत्यक्ष अथवा टपालाद्वारे पाठवावेत. अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला, दहावी मार्कशिट व प्रमाणपत्र,अपंगत्व असल्याबाबतचे सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र, आधार कार्ड, युडीआयडी कार्ड, डोमिसाईल प्रमाणपत्र व उत्पन्नाचा दाखला छायांकित प्रतिसह सादर करावा. प्रवेश अर्ज प्राप्त झाल्यानंतर तज्ञ समिती व्दारे मुलाखती घेऊन प्रवेश देण्यात येईल. अधिक माहितीसाठी ०२३३-२२२२९०८ मोबाईल ९९२२५७७५६१, ९५९५६६७९३६, ९३२५५५५९८१ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

### शांताबाई लांडे यांचे निधन



**बीड । प्रतिनिधी**

कै. शांताबाई वसुदेव लांडे यांचे आल्पाशा आजाराने काल दि. १६/०९/२०२५ मंगळवारी छत्रपती संभाजीनगर येथे निधन झाले त्या सोन्नाखोटा येथील शिवाजी लांडे व विठ्ठल लांडे यांच्या मातोश्री होत्या त्याचा शांत संयमी स्वभाव होता. चार पाच दिवसांपूर्वी त्या दुखन्यानी त्रस्त होत्या त्यांना दोन मुले एक मुलगी नातवडे असा परिवार आहे. लांडे परिवाराच्या दुःखात दै. मराठवाडा पत्र परिवार देखील सहभागी आहे.